शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

सामाजिक शास्त्र मंडळ आयोजित (अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष)

प्रथम वर्ष बी. एड. २०२४-२६

भूगोल दिन व मकर संक्रांत कार्यक्रम

दिनांक - १४/०१/२०२५

कार्यक्रमाची उद्दिष्टे :-

१) भूगोल दिन व मकर संक्रांत कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करणे.

२) भूगोल दिन व मकर संक्रांति निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

३) भौगोलिक व ऐतिहासिक ग्रंथांचे प्रदर्शन भरवणे.

४) भौगोलिक व ऐतिहासिक ग्रंथ वाचून हस्तलिखित प्रकाशित करणे.

५) प्रशिक्षणातून कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये भौगोलिक दृष्टिकोन विकसित करणे.

उपस्थित संख्या :-

प्राचार्य व प्राध्यापक – ६

प्रथम वर्ष बी. एड. – ४५

द्वितीय वर्ष बी. एड. – २०

कार्यक्रमाची कार्यवाही :-

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे भूगोल दिन व मकर संक्रांतीच्या संयुक्त कार्यक्रम ०४/०१/२०२५ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले, सर्व प्राध्यापक तसेच प्रथम आणि द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होते. त्यावेळी भूगोलाचा इतिहास या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. तसेच भौगोलिक व ऐतिहासिक ग्रंथाचे प्रदर्शन भरवण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये वर्षा आतकर व तनुश्री आठवले या विद्यार्थिनींनी भूगोल दिन व मकर संक्रांतीचे भौगोलिक व सांस्कृतिक महत्त्व विशद केले. तसेच सी. डी. देशपांडे यांच्या कार्याबद्दल आढावा घेण्यात आला. यासाठी पीपीटी द्वारे सादरीकरण करण्यात आले. तसेच महेंद्र वाघ, माधुरी साळुंखे, काजल पवार यांनी विविध भौगोलिक खेळ तयार करून त्याचे सादरीकरण एलसीडी द्वारे केले व त्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला सामाजिक शास्त्र मंडळातील दहा

Scanned with OKEN Scanner

विद्यार्थ्यांनी संक्रांति वर आधारित पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमाच्या आयोजन भूगोल विभाग प्रमुख डॉ. उज्वला डोणे यांनी केले. सूत्रसंचालन ऋणाली कचरे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner